# इतिहास विभाग

## नबिरा महाविद्यालय, काटोल
## जि. नागपूर
## शैक्षणिक सहलीचा अहवाल
## सत्र २०१६–२०१७

आमच्या महाविद्यालयातील इतिहास विभागातर्फे ऐतिहासिक स्थळांना भेटी देण्याच्या उद्देशाने दरवर्षी शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात येते. यावर्षीही दिनांक १५ फेब्रुवारी २०१७ ते २२ फेब्रूवारी २०१७ या कालावधीत महाराष्ट्रातील ऐतिहासीक व सांस्कृतीक स्थळांना भेटी देण्यात आल्या. नबिरा महाविद्यालयाचे इतिहास विभागप्रमुख प्रा.डॉ. आर.आर.धोटे ह्यांचे मार्गदर्शनाखाली दिनांक १५ फेब्रूवारी २०१७ रोज बुधवारला महाविद्यालयाच्या परिसरातून आम्ही सहलीकरिता प्रस्थान केले.

दिनांक १६ फेब्रुवारी रोज गुरूवारला सकाळी ६.०० वाजता आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांची कुलदेवता तुळजापुरची तुळजाभवानी मातेच्या दर्शनाने सहलीचा शुभारंभ केला. तेथील मंदिराच्या शिल्पकलेविषयी डॉ. धोटे सरांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. तुळजापूरचा सांस्कृतीक ठेवा जतन करून आम्ही स्वामी समर्थाच्या अक्कलकोट नगरी करिता प्रस्थान केले. दुपारी १.३० वाजता स्वामी समर्थाच्या मंदिराचे दर्शन घेवून आम्ही पंढरपूरच्या वाटेने निघालो. सायंकाळी ५.०० वाजता पंढरपुरच्या विठ्ठल–रूक्मीणी मंदिरात जाऊन सर्वांनी दर्शन घेतले प्रा.डॉ. व्ही.के. बागवाले ह्यांनी पंढरपुरच्या मंदिराचा इतिहास विद्यार्थ्यांना विशद केला. पंढरपुरला श्री संत तनपूरे महाराजांच्या मठात आम्ही पहीला मुक्काम केला.

दि. १७ फेब्रुवारी रोज गुरूवारला आम्ही पंढरपूरहून सकाळी ५.०० वाजता कोल्हापूरसाठी प्रस्थान केले. दुपारी १.०० वाजता महालक्ष्मी मातेच्या मंदिराला भेट दिली. मराठ्यांची दुसरी शाखा असलेल्या छत्रपती शाहू महाराजांच्या राजवाड्याला भेट देवून डॉ. व्ही.बी. फरकाडे ह्यांनी छत्रपती शाहू महाराजांच्या कल्यानकारी धोरणाविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कोल्हापुरातील ऐतिहासीक स्थळांना भेटी देवून आम्ही दुपारी ३.०० वाजता सिंधूदुर्गसाठी प्रस्थान केले. विद्यार्थ्यांनी सह्यांद्री घाटाचा अभ्यास करत तेथील भौगलिक परिस्थितीचे जवळून निरीक्षण करित अनमोल ठेवा जतन करित आम्ही रात्री सिंधूदुर्ग–मालवन येथे मुक्काम केला.

दि. १८ फेब्रुवारी रोज शुक्रवारला सकाळी ८.०० वाजता आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमाराचे प्रमुख केंद्र असलेल्या सिंधुदूर्ग किल्ल्यात प्रवेश केला. सिंधुदूर्ग किल्ल्याचे महत्व डॉ. आर.आर. धोटे सरांनी विषद केले. या किल्ल्यांचे क्षेत्र कुरटे बेटावर ४८ एकरावर पसरलेले असून तटबंदीची लांबी तीन कि.मी. आहे. बुरूजांची संख्या ५२ व ४५ दगडी जिने आहेत. या किल्ल्यामध्ये महाराष्ट्रातील एकमेव शिवाजी महाराजांचे शंकराच्या रूपातील मंदिर आहे. सिंधुदूर्ग वरून आम्ही गणपतीपुळेसाठी प्रस्थान केले. सायंकाळी ५:००. वाजता गणपतीपुळेला पोहचून अरबी समुद्राचे विशाल रूप बघून

गणपतीचे दर्शन घेतले. यावेळी विद्यार्थ्यांचा उत्साह कमालीचा जाणवला. गणपतीपुळेहून आम्ही रात्रीचा प्रवास करित पहाटे ५:०० वाजता छत्रपती शिवाजी महाराजांची द्वितीय राजधानी रायगडला पोहचलो.

दि. १९ फेब्रुवारी रोज शनिवार हा शिवजयंतीचा ऐतिहासिक दिवशी आम्हास रायगडावर घालविण्याचे भाग्य लाभले. सकाळी ५:०० वाजता आम्ही अजिंक्य रायगडाच्या पहिल्या पायरीला नमन करीत मोठ्या उत्साहाने शिव घोषाच्या गजरात १४५० पायऱ्या अवघ्या दोन तासास चढून गेलो. हा किल्ला सह्याद्रीच्या पर्वत रांगात असून समुद्र सपाटीपासून ८२० मी. (२७०० फुट) उंचीवर आहे. डॉ. धोटे सरांनी रायगड किल्ल्याचे मराठ्यांच्या इतिहासातील महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. ६ जून १६७४ रोजी छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक याच किल्ल्यावर झाला. या किल्ल्यावरील महत्वाचे स्थळे म्हणजे खुबलठा, बुरूज, नानादरवाजा, मशिद मोर्चा, महादरवाजा, चोरदिंडी, हत्तीतलाव, गंगासागर तलांव, स्तंभ, पालखी दरवाजा, मिणा दरवाजा, राजभवन, रत्नशाळा, राजसभा, नगारखाना, बाजारपेठ, शिर्काई देऊळ, जगदिश्वर मंदीर, शिवाजी महाराजाची समाधी, कुशावर्त तलाव, वाघ दरवाजा, टकमक टोक, हिरकणी बुरूज, आणि राण्यांचे महाल इ. प्रमुख स्थळांचे निरीक्षण करीत रायगडावरून सह्याद्रीचे अतिभव्य स्वरूप अगदी जवळून बघून सर्वांनी शिवाजी महाराजाच्या दुरदृष्टी बद्दल कुतूहल व्यक्त केले. रायगडावरून आम्ही दुपारी १:०० वाजता उतरणीचा प्रवास सुरू केला. २:३० वाजता आम्ही रायगडाच्या पायथ्याशी वसलेल्या ऐतिहासिक गावाला भेट दिली. ते गाव पाचाड होय. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या मातोश्री राजमाता जिजाबाईच्या वास्तव्याकरीता पाचाडला भव्य राजवाडा बांधलेला होता. तेथेच जिजाबाईचे मृत्यूपर्यत वास्तव्य होते. पाचाड येथेच जिजाबाईची समाधी आहे. राजवाडा आणि जिजाबाईच्या समाधीचे निरीक्षण व दर्शन घेऊन आम्ही दुपारी ३:३० वाजता पुढील प्रवासाला सुरूवात केली. रात्री पोलादपुर येथे मुक्काम केला.

दिंनाक २० फेब्रवारी रोज रविवारला सकाळी ७:०० वाजता आम्ही पोलादपुर हून पुढील भ्रमंतीला प्रारंभ केला. सकाळी ९:०० वाजता जवळीच्या निर्बीड अरण्यातून घाट माता चढत उतरत आम्ही प्रतापगडावर पोहचलो. छत्रपती शिवाजी महाराजांनी पेशवे मोरोपंत पिंगळेच्या देखरेखीखाली प्रतापगडाचे बांधकाम केले. याच किल्ल्याच्या पायथ्याशी १० नोव्हेंबर १६५९ रोजी शिवाजी महाराज आणि अफजल खान यांच्यात युद्ध झाले. त्यात शिवाजी महाराजांनी अफजल खानाचा वध केला. प्रतापगडाच्या पायथ्याशी आजही अफजल खानाची कबर आहे. प्रतापगडावर महादरवाजा, चिल्खती बुरूज, भवानी मातेचे मंदीर, शिवलिंग, सरसेनापती, खंबीरराव मोहित्याच्या तळवाटीचे ठिकाण, समर्थ स्थापित हनुमानाचे मंदिर, केदारेश्वर महाराजांचे मंदिर, राजमाता जिजाबाईच्या वाड्याचे अवशेष, किल्ल्याच्या मधोमध शिवाजी महाराजांचा अश्वारूळ पुतळा इ. प्रेक्षणिय स्थळे आहे. प्रतापगडाच्या बुरूजांवरून फेरफटका मारतांना जावळी खुऱ्याचे विहंगम दृष्य दिसते. प्रतापगड अभ्यासतांना अंगात विरश्री संचारल्याचा अनुभव येत होता.

प्रतापगडावरून आम्ही दुपारी १:०० वाजता महाबळेश्वर करीता प्रस्थान केले. महाबळेश्वर हे ठिकाण महाराष्ट्रातील द्वितीय क्रमांकाचे सर्वात उंच शिखर असून ते थंड

स्वेचे ठिकाण आहे. महाबळेश्वरला सर्वप्रथम आम्ही ज्योर्तिलिंगाचे दर्शन घेतले. याच ठिकाणी इ. स. १६६५ मध्ये शिवाजी महाराजांनी आपल्या मातोश्री जिजाबाई यांच्या तुलादान विधी पार पाडला होता. त्यानंतर आम्ही पंचगंगा मंदीराचे दर्शन घेतले व महाबळेश्वर येथिल विविध नैसर्गिक सौंदर्याने नटलेल्या स्थळांची सैर करीत विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद घेतला. सांयकाळी ६:०० वाजता आम्ही महाबळेश्वर वरून प्रस्थान करून आळंदीच्या दिशेने प्रवास सुरू केला. रात्रीचा मुक्काम आळंदीला केला.

दिंनाक २१ फेब्रुवारी २०१७ रोज सोमवारला आम्ही सकाळी ६:३० ला संत ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधी मंदीराचे दर्शन घेतले. तेथिल इंद्रायनी नदीवरील घाट बघून आम्ही सकाळी ८:०० वाजता संत श्रेष्ठ तुकाराम महाराजांच्या वास्तवाने पावण झालेल्या त्यांच्या जन्म गावी देहू येथे पोहचलो. तुकाराम महाराजांचे जन्म स्थळ, मठ, मंदीरे आणि इंद्रायणीचा घाट बघून आम्ही सकाळी ११:०० वाजता छत्रपती शिवाजी महाराजांचे जन्मस्थान असलेल्या शिवनेरी किल्ल्यावर गेलो. शिवनेरी हा जुन्नर गावाजवळ असलेला प्राचीन किल्ला, येथे आजही शिवजन्माचे ठिकाण चांगल्या अवस्थेत आहे. शिवनेरी किल्ल्यावर शिवाई देवीचे मंदीर आणि जिजाबाई व बालशिवाजी यांच्या प्रतिमा आहे. या किल्ल्याचा आकार शंकराच्या पिंडीसारखा वाटतो. या किल्ल्यावर अंम्बर खाना, शिवकुंज, कढेलोट कढा, साखळीची वाट, सात दरवाज्याची वाट इ. स्थळे ही प्रेक्षणिय आहे. प्रा. एस.बी. बेहनिये यांनी शिवनेरी किल्ल्याचा इतिहास विद्यार्थ्यांना सविस्तर त्यांच्याकडून दाखविला. दुपारी ३:०० वाजता आम्ही शिवनेरीहून शिर्डी करीता प्रस्थान केले. सांयकाळी ५:३० वाजता शिर्डीला पोहचून आम्ही साईबाबांचे दर्शन घेतले. रात्री ८:३० वाजता आम्ही शिर्डीहून वेरूळच्या दिशेने प्रस्थान केले व वेरूळला मुक्काम केला. दिंनाक २२ फेब्रुवारी २०१७ रोज मंगळवारला सकाळी ७:०० वाजता घ्रुष्णेश्वरांच्या ज्योर्तिलिंगाचे दर्शन घेऊन आम्ही सकाळी ८:३० वाजता वेरूळच्या जगप्रसिद्ध लेण्या व कैलास मंदीराला भेट दिली. वेरूळ येथिल लेण्यांचे निरीक्षण करीता आम्ही सर्वच लेण्या बारकाईने अभ्यासल्या. दुपारी १:०० वाजता आम्ही वेरूळहून पुढच्या प्रवासाला निघालो. दुपारी २:१५ ला आम्ही देवगिरी अर्थात दौलताबाद किल्ल्याच्या पायथ्याशी आलो. देवगिरी येथे यादवकालीन ऐतिहासिक किल्ला आहे. डॉ. धोटे सरांनी विद्यार्थ्यांना देवगिरी किल्ल्याचा इतिहास सांगितला, आम्ही देवगिरीच्या किल्ल्याचा अभ्यास करून तेथिल हिरवळीवर बराच वेळ उसंत घेऊन सांयकाळी ५:३० वाजता देवगिरीहून प्रस्थान केले. या रात्री आम्ही रात्रप्रवास करीत काटोलच्या दिशेने निघालो. दिंनाक २३ फेब्रुवारी २०१७ रोज बुधवारला सकाळी १०:०० वाजता आम्ही काटोलला येऊन पोहचलो. अशाप्रकारे 'आमची ऐतिहासीक सहल यशस्वीरीतीने पार पडली.

प्रवासा दरम्यान विद्यार्थ्यांचे वर्तन अतिशय शिस्तबद्ध होते. महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या सुचनांचे पालन यथा योग्य झाले.

डॉ. आर.आर. धोटे


इतिहास विभाग प्रमुख
नबीरा महाविद्यालय, काटोल

# नबिरा महाविद्यालय काटोल जि. नागपुर

## एम. ए. इतिहास विभाग,

## इतिहास विषयावर मार्गदर्शन

### इतिहास स्पर्धा परीक्षेचा आत्मा : प्रा. डॉ. ठवळे



काटोल (ता.प्र.) : 'इतिहास' हा विषय एकूणच स्पर्धा परिक्षेचा आत्मा आहे, असे प्रतिपादन बॅरि. शेषराव वानखेडे महाविद्यालय, मोहपा येथील इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. संजय ठवळे यांनी केले. येथील नबिरा महाविद्यालयात इतिहास विभागांतर्गत इतिहास विषयावर नुकत्याच आयोजित व्याख्यानमालेत ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नबिरा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजू धोटे उपस्थित होते. स्व. वसंतराव कोल्हटकर कला महाविद्यालय, रोहणा, जि. वर्धा येथील इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. तिर्थनंदन बन्नगरे यांनी मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धात संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांची भूमिका विशद करतानाच पुरातकालीन नाण्यांविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. राणी लक्ष्मीबाई महिला महाविद्यालय, सावरगाव येथील इतिहास विभागप्रमुख प्रा. डॉ. चंद्रशेखर क्षीरसागर यांनी अरब व तुर्कांची भारतातील आक्रमणे या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन एम.ए. भाग १ ची विद्यार्थिनी भाग्यश्री गुरडे हिने, प्रास्ताविक प्रा. शिवचरण बेहनिया तर आभार प्रा. डॉ. विलास फरकाडे यांनी मानले.

दि. ०३ ऑक्टों. २०१६

* **मार्गदर्शक :-**

① प्रा. डॉ. बन्नगरे सर

② प्रा. डॉ. ठवळे सर

③ प्रा. डॉ. क्षिरसागर सर.

# RASHTRASANT TUKADOJI MAHARAJ NAGPUR UNIVERSITY

## NOTIFICATION

No. Exams/Ex/ 1616

Nagpur, dated the 6Th March , 2018

**MERIT LIST OF M.A.IV TH SEM (HISTORY) EXAMINATION OF SUMMER-2017**

(Note :- The Concerned Candidates May Raise the Objection if any in the Following List on or Before 7 days in the office of the Director, Board of Examination & Evaluation, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, Nagpur.)

| Order of merit | Roll No. | Name of the students and Address | CGPA 10.00 | OUT OFF 1600 | College/Dept./ Institution |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 631083 | PITAMBAR BHAIYYAJI SUPARE<br>SANT CHOKHOBA WARD, NEAR<br>MAHATMA FULE SCHOOL,<br>HINGHANGHAT, DIST- WARDHA 442301 | 9.44 | 1157 | P.G.T.D. (HUMANITIES), R.T.M.N.U NAGPUR |
| 2 | 631033 | NEHA GIRDHARI BARIYEKAR<br>NEHRU WARD, TIRORA,<br>DIST- GONDIA 441911 | 9.25 | 1158 | V.N. INSTT. OF ARTS & SOC. SCI., NAGPUR. |
| 3 | 631056 | TRIRATNA DADAJI KHOBRAGADE<br>AT- SIRASPUR, TA- CHIMUR,<br>DIST – CHANDRAPUR 442903 | 9.19 | 1147 | V.N. INSTT. OF ARTS & SOC. SCI., NAGPUR. |
| 4 | 631039 | PRIYANKA VASANTA DHANDE<br>AT PO – BINA, (SANGAM). TA- KAMPTEE,<br>DIST- NAGPUR | 9.13 | 1127 | V.N. INSTT. OF ARTS & SOC. SCI., NAGPUR. |
| 5 | 631058 | VANDANA RAMCHANDRA MANDAOKAR<br>AT- KOTEWADA, TA- HINGNA,<br>DIST- NAGPUR | 9.06 | 1124 | V.N. INSTT. OF ARTS & SOC. SCI., NAGPUR. |
| 6 | 631190 | PRIYANKA ANYAJI GAIKWAD<br>POST- SONALI, TALUKA- KATOL,<br>DIST- NAGPUR, 441306 | 9.03 | 1106 | NABIRA MV, KATOL |
| 7 | 631084 | PRADIP LAXMAN BORKAR<br>AT POST- PALEBARSAR, AT-SAOLI,<br>DIST - CHANDRAPUR | 8.94 | 1120 | P.G.T.D. (HUMANITIES), R.T.M.N.U NAGPUR |
| 7 | 631038 | PRIYANKA PRAKASH KAWDE<br>SHASHTRI WARD,<br>BEHIND NIRMAL TALKIES,<br>GONDIA - 441601 | 8.94 | 1107 | V.N. INSTT. OF ARTS & SOC. SCI., NAGPUR. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 631081 | PAWAN DONUJI HARGULE<br>AT- PALORA, TA- ARMORI,<br>DIST- GADCHIROLI, 440033 | 8.91 | 1075 | P.G.T.D. (HUMANITIES), R.T.M.N.U NAGPUR |
| 9 | 631196 | SHUBHANGI PRABHAKAR BABULKAR<br>POST- SAWARGAON, TALUKA- NARKHED,<br>DIST- NAGPUR 441306 | 8.83 | 1032 | NABIRA MV, KATOL |
| 10 | 631164 | NILAWATI KAILAS MARASKOLHE<br>AT- UMBRI, PO- MUSEWADI,<br>TALUKA- RAMTEK, DIST- NAGPUR 441106 | 8.81 | 1088 | P.W.S. COLLEGE, NAGPUR |

**By order of the Board of Examination and Evaluations**

**Director**
**Board Of Examination & Evaluation**
**Rashtrasant Tukadoji Maharaj**
**Nagpur University**

**Nagpur**

**Date: 6Th March 2018**

Copy forwarded for information to :-

1) The Principals / Examinees concerned,
2) The Controller of Examinations, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, NAGPUR.
3) The Finance & Accounts Officer, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, NAGPUR.
4) The Deputy Registrar (Dev.), Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, NAGPUR.
5) The Deputy Registrar (Acad.), Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, NAGPUR.
6) The Director, Students Welfare, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, NAGPUR.
7) The Asstt. Registrar(Enqr.), Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, NAGPUR.
8) The Asstt. Registrar(G.A.), Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, NAGPUR.
9) The Asstt. Registrar (Sub-centre), Gadchiroli.
10) The Information Scientist, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, NAGPUR.
11) The Superintendent (Result), Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, NAGPUR.
12) The Statistician, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, NAGPUR.
13) The Migration Clerk, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, NAGPUR.
14) The Diploma/Degree Clerk, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, NAGPUR.
15) *The Record Keeper, Office of the Controller of Examination, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur* University, NAGPUR.
16) The Enquiry Clerk, Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University, NAGPUR.
17) The Editors of Daily News papers in Vidarbha Region for favour of publishing the above Notification in the next issue of their esteemed papers as a "NEWS ITEM".

**ASSTT. REGISTRAR(EXAMS.)**
**Rashtrasant Tukadoji Maharaj**
**Nagpur University**

**C:\My Documents\MERIT B.A..doc**